MHKO160003422025

## किरकोळ दिवाणी अर्ज क्र. १६/२०२५ मधील नि.क्र.१ वरील आदेश

१. अर्जदार यांनी प्रस्तुतचा अर्ज, सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ९ नियम ९ अन्वये किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० पुन्हा फैलावर घेणेकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांनी वि.प. यांचेविरूध्द किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० चे कामी अर्ज दाखल केला होता. सदरचा अर्ज दि.१९/०३/२०२५ रोजी अर्जदार यांनी पुरावेबाबत कोणतीही तजवीज न केलेने काढून टाकण्यात आला आहे. अर्जदार यांनी पुढे कथन केले की ते वयोवृध्द असून त्यांना सतत बी.पी. व शुगरचा त्रास आहे, तसेच अपंगत्व असलेने ऐकू येण्याची क्षमता देखिल कमी झाली आहे. अर्जदार यांना वयोमानामुळे व आजारपणामुळे कोर्टात येणे शक्य न झालेने त्यांचेविरूध्द आदेश पारीत झाले आहेत. तसेच सदर आदेशाबाबत त्यांना नुकतेचे समजून आले. शेवटी त्यांनी अर्ज मंजूर करून किर.दि.अर्ज क्र.०७/२०२० मधील दि.१९/०३/२०२५ रोजीचा मूळ अर्ज काढून टाकणेचा आदेश रद्द करून अर्ज पुन्हा फैलावर घेणेबाबत आदेश होणेची विनंती केली.

३. वि.प. हे सदरकामी हजर झाले, मात्र पुरेशी संधी देऊनदेखिल त्यांनी सदरकामी म्हणणे न दिलेने सदरचा अर्ज त्यांचेविरूध्द म्हणणेविना चालविण्यात येत आहे.

४. मी अर्जदार यांचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला आहे. अर्जदार यांचे वादकथन आणि अभिलेखावरील पुरावा वाचला आहे. अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी नि.क्र.३ सोबत किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ०७/२०२० मधील नि.१ वरील आदेशाची व रोजनाम्याची स.शि.ची नक्कल इ. कागदपत्रें सादर केली आहेत. अर्जदार यांनी नि.०८ वर त्यांचे प्रतिज्ञापत्र सादर करून त्यांनी त्यामध्ये मूळ अर्जाप्रमाणे कथन केले आहे. अर्जदार यांनी सदर अर्जाद्वारे किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० मधील दि.१९/०३/२०२५ रोजी अर्जदार यांनी पुरावेबाबत कोणतीही तजवीज न केलेने काढून टाकण्याबाबत केलेला आदेश रद्दबाबत करणेबाबत विनंती केली आहे. अर्जदार यांनी कथन केले की त्यांना सतत बी.पी. व शुगरचा त्रास असून अपंगत्व आहे व ऐकू येण्याची क्षमता देखिल कमी झाली आहे, तसेच वयोमानामुळे व आजारपणामुळे कोर्टात येणे शक्य न झालेने त्यांचेविरूध्द आदेश पारीत झाले आहेत. वि.प. यांनी अर्जदार सदरकामी कोणतेही म्हणणे न दिलेने सदरचा अर्ज त्यांचे म्हणणेविना चालविण्यात येत आहे. अर्जदार यांनी त्यांचे अर्जातील म्हणण्याचे पृष्ट्यर्थ कोणताही कागदोपत्री किंवा वैद्यकीय पुरावा सादर केलेला नाही. तथापि, अर्जदार व वि.प. यांचेतील मूळ वाद कायमस्वरूपी मिटण्यासाठी किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० हा गुणदोषावर निकाली होणे गरजेच आहे. तसेच अधिक गुंतागुंत टाळणेसाठी देखिल सदरचा अर्ज मंजूर करणे गरजेचे आहे. तथापि अर्जदार यांनी सदर अर्जाचे कामी आवश्यक असा कोणताही वैद्यकीय किंवा अन्य पुरावा दिलेला नाही. अशा परिस्थितीत झालेला विलंब

विचारात घेता सदरचा अर्ज योग्य त्या दंड रकमेवर मंजूर करणे न्यायेचित होईल. तसेच सदरचा अर्ज मंजूर केलेने वि.प. यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. एकूणच, किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० हा अर्ज काढून टाकणेचे दि.१९/०३/२०२५ रोजीचे आदेश रद्द करून अर्ज पुन्हा फैलावर घेणेबाबत आदेश तो योग्य त्या दंड रकमेवर मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, वर नमूद चर्चेस अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

<u>आदेश</u>

१. अर्जदार यांनी तालुका विधी सेवा समिती, शाहुवाडी यांचेकडे दंड रक्कम रू.५,०००/- (अक्षरी रक्कम रू. पाच हजार ) आदेश तारखेपासून तीस दिवसांचे आत भरावी या अटीवर सदरचा अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० हा अर्ज दि.१९/०३/२०२५ रोजी ज्या टप्प्यावर काढून टाकण्यात आला त्याच टप्प्यावर पुन्हा फैलावर घेण्यात येत आहे.

३. दंडाची रक्कम भरल्यानंतर प्रस्तुत अर्जातील पूर्ण संचिका किरकोळ दिवाणी अर्ज क्र.०७/२०२० सोबत ठेवण्यात यावी.

४. सदरचा अर्ज याद्वारे निकाली करणेत येतो.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
Digitally signed by Pankaj Bhimrao Pawar
Date: 2026.07.23 17:41:01 +0530

**दिनांक - २३/०७/२०२६**

**( पी. बी. पवार )**
**दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**मलकापूर-शाहुवाडी, जि. कोल्हापुर**